# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय
## पाणी वाहतुक निविदा सूचना

क्र.टंचाई/कार्या-१९/अ-८९१/२०१०                                   अहमदनगर दिनांक १८/०५/२०१०

अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी ७५०० ते १०००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या बसविलेले ट्रक याबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर मोहारबंद निविदा मागवित आहेत. कोरे निविदा फॉर्म रु. १०००/- (एक हजार मात्र) शासकिय खजिन्यात '' ०२५० इतर सामाजिक सेवा - ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८००) या सदराखाली भरुन नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मिळतील. सदरची रक्कम परत मिळणार नाही.

| कोरे निवीदा फॉर्म विक्रीचा कालावधी | सीलबंद निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| दिनांक २०/०५/२०१० (वार- गुरुवार) पासून दिनांक २८/०५/२०१० (वार- शुक्रवार) (कार्यालयीन वेळेत, सुटीचे दिवस वगळून) | दिनांक २९/०५/२०१० (वार- शनिवार) रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थळ-नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | दिनांक २९/०५/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. स्थळ-नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |

१) निविदेच्या शर्ती व अटी जिल्हाधिकारी कार्यालय (टंचाई शाखा), अहमदनगर येथे कार्यालयीन वेळेत ( सकाळी १०-०० ते दुपारी ५-३० पर्यंत ) विनामूल्य पाहवयास मिळतील.

२) निविदा सादर करताना निविदेसोबत बयाणा रक्कम रु.५०,०००/-(पन्नास हजार मात्र) मुलकी अनामत ( **Revenue Provincial Diposit** ) या लेखाशिर्षाखाली चलनाने भरुन मूळ चलन निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे व रु ५.०० लक्ष रकमेची जिल्हाधिकारी अहमदनगर या नावाने राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

३) निविदा फॉर्म पोष्टाने पाठविले जाणार नाहीत. तसेच मोहारबंद निविदा प्रत्यक्षात नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे दिनांक २०/०५/२०१० ते २९/०५/२०१० (वेळ ११.०० ते ३.००) या कालावधीत कार्यालयीन कामाचे दिवशी स्विकृत करण्यात येतील. पोष्टाने प्राप्त होणा-या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

४) मोहारबंद निविदा दिनांक २९/०५/२०१० (वार- शनिवार वेळ-दुपारी ४.०० वा.) नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील. मोहरबंद निविदा उघडण्याचा दिनांक व वेळेत बदल झाल्यास तो निविदाधारकांना कळविण्यांत येईल.

५) निविदापूर्व बैठक दिनांक २४/०५/२०१० रोजी (वार- सोमवार) वेळ-११.०० वा. निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात घेण्यात येईल.

६) कामाचा कालावधी हा दिनांक १-जून-२०१० ते ३१-मार्च-२०११ पर्यंत राहिल.

७) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवले आहेत.

८) प्रस्तुत निविदा ही www.ahmednagar.nic.in वर पाहावयास मिळेल.

सही/-

जिल्हाधिकारी अहमदनगर